ISSN: 2321-8819 (Online) 2348-7186 (Print) Impact Factor: 1.498 Vol. 5, Issue 7, July 2017

# औरंगाबाद शहरातील माध्यमिक शाळांन मध्ये खेळांचे क्रीडांगण आहे किंवा नाही याचा अभ्यास

सय्यद समियोदीन स.बद्रोदीन[१] व डॉ.मो.अताउल्लाह जागीरदार.
[१] डॉ.बा.आ.म.वि.औरंगाबाद,
syedsb@rediffmail.com
९३२५७१०२३५.
[२] शारीरिक शिक्षण विभाग मिल्लीया कॉलेज, बीड - ४३११२२.
syedsb@rediffmail.com
९४२२८८७९६५

**सारांश** : प्राथमिक स्तरा पासून जर विदयार्थ्यांना क्रीडांगणावर विविध खेळाचे प्रशिक्षण दिले गेले तर भविष्यात चांगले खेळाडू निर्माण होऊ शकतात शारीरिक शिक्षणामुळे तरून पिढी निरोगी व निकोप राहण्यास मदत होते.

श्वाससंस्था, पचन संस्था यांना योग्य प्रकारे कार्यरत ठेवून शरीर सुदृढ बनवण, शारीरिक शिक्षाणाच्य माध्यमातून विद्यार्थ्यांना कठोर मेहनतीची सवयीं. जबाबदारीची जाणीव, नीटनीटकेपणा काटेकोरपणा इत्यादी सकारात्मक बदल घडून येतात इतकेच नव्हे तर मनाची एकाग्रता साधणेही यामुळे सहज शक्य होते. यामुळे सहजरीत्या विदयार्थ्यांमध्ये आरोग्यविषयक जाणीवेची वाढ होते. त्यामुळे तो कुटुंबातील व समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या आरोग्याबाबतही जागरूक होतो. विदयार्थी आपल्या सवतःच्या शरीरिक व आरोग्य विषयक सवयींबाबत दक्ष राहातो.

- प्रस्ताविक :

प्राथमिक स्तरा पासून जर विदयार्थ्यांना क्रीडांगणावर विविध खेळाचे प्रशिक्षण दिले गेले तर भविष्यात चांगले खेळाडू निर्माण होऊ शकतात शारीरिक शिक्षणामुळे तरून पिढी निरोगी व निकोप राहण्यास मदत होते.

श्वाससंस्था, पचन संस्था यांना योग्य प्रकारे कार्यरत ठेवून शरीर सुदृढ बनवण, शारीरिक शिक्षाणाच्य माध्यमातून विद्यार्थ्यांना कठोर मेहनतीची सवयीं. जबाबदारीची जाणीव, नीटनीटकेपणा काटेकोरपणा इत्यादी सकारात्मक बदल घडून येतात इतकेच नव्हे तर मनाची एकाग्रता साधणेही यामुळे सहज शक्य होते. यामुळे सहजरीत्या विदयार्थ्यांमध्ये आरोग्यविषयक जाणीवेची वाढ होते. त्यामुळे तो कुटुंबातील व समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या आरोग्याबाबतही जागरूक होतो. विदयार्थी आपल्या सवतःच्या शरीरिक व आरोग्य विषयक सवयींबावत दक्ष राहातो.

- उद्दिष्ट्ये :-
  - औरंगाबाद शहरातील माध्यमिक शाळांन मध्ये खेळांचे क्रीडांगणा आहे किंवा नाही या विषयी माहिती गोळा करने.
  - संकलित माहितीचे संख्याशास्त्रीय विश्लेषण करणे.

  विश्लेषण केलेल्या माहितीचे निष्कर्ष काढणे

- संशोधनाची व्याप्ती :-
  - प्रस्तुत संशोधनाचे क्षेत्र हे औरंगाबाद शहरातील २० माध्यमिक शाळेतील क्रीडांगणा विषयी मर्यादित आहे.
  - प्रस्तुत संशोधन हे औरंगाबाद शहरातील माध्यमिक शाळेतील २०० विद्यार्थी पुरते मर्यादीत आहे.
- संदर्भ साहित्याचा आढावा :

आयोवा येथील पब्लिक स्कूल मधील निवडक विद्यार्थ्यांच्या शारीरिक शिक्षण उपक्रमांचे सर्वेक्षण

बंडगार्ड[१] यांनी केले आहे. सदर संशोधनाचा उद्देश हा आयोवा येथील पब्लीक स्कूल मधील शारीरिक शिक्षण उपक्रमाची स्थिती तपासणे त्याच बरोबर व्यवसायीक सिध्दता व कार्यभार तपासणे हा होता.

संशोधकाने निवडक ७२ माध्यमिक विद्यालयाना भेटी देऊ न माहिती गोळा केली. सदर माहिती वरून असा निष्कर्ष काढण्यात आला की, उपरोक्त सर्व शाळांमध्ये शारीरिक शिक्षण,



Scanned by CamScanner

प्रशिक्षण, व्यवसायीक सिध्दता व कार्यभार याबाबी समाधानकारक व योग्य आहेत.

नेसन[२] यांनी लुईसीयाना येथील पब्लिक स्कूल मधील शारीरिक शिक्षण उपक्रमांचे मूल्यमापन करण्यासाठी सर्वेक्षण केले आहे. सदरच्या सर्वेक्षणाचा, हेतू त्या शाळेमधील उपलब्ध क्रीडा साहित्य, उपलब्ध वर्ग खोल्या, दिले जाणारे प्रशिक्षण, आरोग्य विषय सुविधा आणि आर्थिक मदत इत्यांदीचा अभ्यास करण. त्यासाठी त्यांनी प्रश्नावलीचा उपयोग केला. यादृच्छिक पध्दतीने निवडलेल्या १०० शाळांमधून सदरची माहिती गोळा केली. या माहितीवरून त्यांना असे आढळून आले की, या शाळामध्ये अपेक्षित प्रमाणात शारीरिक शिक्षण विषय शिक्षक उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे क्रीडा सुविधा व साधने उपलब्ध आहेत. त्याचबरोबर अंतरशालेय क्रीडा सुविधा व साधणे उपलब्ध आहेत. त्याचबरोबर अंतरशालेय क्रीडा स्पर्धा व त्यासाठीच्या आवश्यक तरतुदी पुरेशा प्रमाणात आहेत.

हार्लाचर[३] यांनी कॉलिफोर्नियामधील कनिष्ठ महाविद्यालयीस्तरावर शारीरिक शिक्षण कार्यक्रमासाठी उपलब्ध सुविधांची पहाणी करून संशोधन केले आहे. सदर अभ्यासासाठी प्रश्नावली पध्दतीचा वापर करण्यात आला. कनिष्ठ महाविद्यालयाकडे प्रश्नावली पाठवून माहिती संकलित करण्यात आली. सदर माहितीवरून असा निष्कर्ष काढण्यात आला की, या स्तरावरील शिक्षण

क्लीफोर्ड[४] यांनी दक्षिण अलास्का राज्यातील माध्यमिक शाळांमधील शारीरिक शिक्षण उपक्रम व सुविधा यांचे सर्वेक्षण केले आहे. सदर संशोधनाचा हेतू हा ख्व्रद्रदृद्धद्यड्ढ घ्ड़दृद्धड्ड ड़ड्ढद्धड्ड ग़्दृ. क्ष नुसार शालेय शिक्षणातील क्रीडा विषय सुविधा उपक्रम यांचे मूल्यमापन करणे होय. सदर संशोधकाने आलास्का राज्यातील सर्व शळांना भेटी देवून प्रत्यक्ष निरीक्षणाद्वारे माहिती संकलीत केली. सदर माहितीवरून संशोधन असा निष्कर्ष काढतो की, आलास्का राज्यातील शाळांमध्ये अपेक्षित दर्जापेक्षा कमी प्रमाणात शारीरिक शिक्षण उपक्रम राबविले जातात.

- शारीरिक शिक्षणासंबंधी चे अहवाल.
  - राष्ट्रीय क्रीडा धोरणातील काही महत्वाच्या शिफारशी खालील प्रमाणे[५]

शैक्षणिक संस्थानातील शारीरिक शिक्षणाचे स्थान अबाधीत आहे. उत्कृष्ट खेळाडूंचा शोध घ्यावा.

खेडे व तालुका पातळीवर खेळाच्या सोई टप्प्या टप्प्याने परंतु निश्चित कालावधीत पूर्ण कराव्यात.

सर्व मैदाने व मोकळ्या जागा खेळाडूंसाठी राखून ठेवाव्यात. खेळाडूंच्या पोषक आहाराकडे लक्ष ठेवावे.

क्रीडा विद्यापीठ, क्रीडा महाविद्यालये, क्रीडा वसतीगृहे स्थान करण्यावर भर असावा व त्या ठिकाणी अनिवार्य

शारीरिक कार्यक्रमांबरोबर विशेष क्रीडा कार्यक्रमावर भर द्यावा. क्रीडा साहित्य उद्योग सुरू केलेपाहिजेत.

उत्कृष्ठ खेळाडूंना सवलती दिल्या पाहिजेत.
संशोधनासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

- संशोधनाची कार्यपध्दत

प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब केलेला आहे.

औरंगाबाद शहरातील २० माध्यमिक शाळां ही संशोधनाची जनसंख्या आहे.

- नमुना निवड पध्दत

सुगम यादच्छिक न्यादर्श लॉटरी पध्दतीचा वापर करण्यात आला.

- संशोधनाची साधणे

प्रस्तुत संशोधनात प्रश्नावली ह्या साधनांचा वापर करण्यात आला.

औरंगाबाद शहरातील माध्यमिक शाळांमध्ये खेळाचे क्रीडांगण आहे किंवा नाही? याचा आढावा प्रश्नावली द्वारे घेण्यात आला.

- संख्या शास्त्रीय साधने

प्रस्तुत संशोधनात प्राप्त माहितीचे विश्लेषण करण्यासाठी संशोधकाने शेकडेवारी या संख्याशास्त्रीय साधनांचा वापर केला आहे.

- संकलित माहितीचे संख्याशास्त्रीय विश्लेषण व तक्ते
  - शारीरिक शिक्षकाच्या प्रश्नावलीच्या विश्लेषणा वरून (तक्ता क्र.१)



Scanned by CamScanner

ISSN: 2321-8819 (Online) 2348-7186 (Print) Impact Factor: 1.498 Vol. 5, Issue 7, July 2017

| प्रतिसाद | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ७० | ३५% |
| नाही | १३० | ६५% |
| एकूण | २०० | १००.०० |

- औरंगाबाद शहरातील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना विविध खेळ खेळण्यासाठी क्रीडांगण आहे का?

| प्रतिसाद | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ९ | ४५% |
| नाही | ११ | ५५% |
| एकूण | २० | १००.००% |

- तक्ता क्र. १ वरून - संख्याशास्त्रीय विश्लेषण

(४५ % माध्यमिक शाळे तील शारीरिक शिक्षकांनी होय असे प्रतिसाद दिले)

(५५ % माध्यमिक शाळे तील शारीरिक शिक्षकांनी नाही असे प्रतिसाद दिले)

- निष्कर्ष

तक्ता क्र. १ वरून निष्कर्ष

( ९ शारीरिक शिक्षकाच्या माहिती वरून ४५ऽ टक्के माध्यमिक शाळेमध्ये खेळाचे क्रीडांगण आहे.)

(११ शारीरिक शिक्षकाच्या माहिती वरून ५५ऽ टक्के माध्यमिक शाळेमध्ये खेळाचे क्रीडांगण नाही.)

- माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या प्रश्नावलीच्या विश्लेषणा वरून तक्ता क्र. २
- आपल्या शाळेत खेळाचे क्रीडांगण आहे का?

- तक्ता क्र. २ वरून - संख्याशास्त्रीय विश्लेषण

(३५ % माध्यमिक शाळे तील विद्यार्थ्यांनी होय असे प्रतिसाद दिले )

(६५ % माध्यमिक शाळे तील विद्यार्थ्यांनी नाही असे प्रतिसाद दिले.)

- निष्कर्ष
- तक्ता क्र. २ वरून निष्कर्ष

(७० विद्यार्थ्यांच्या माहिती वरून ३५ % टक्के माध्यमिक शाळेमध्ये खेळाचे क्रीडांगण आहे.)

(१३० विद्यार्थ्यांच्या माहिती वरून ६५ % टक्के माध्यमिक शाळेमध्ये खेळाचे क्रीडांगण नाही.)

- प्रमुख निष्कर्ष
- शारीरिक शिक्षकाच्या माहिती वरून औरंगाबाद शहरातीला माध्यमिक शाळेमध्ये ४५ ऽ क्रीडांगण आहेअसे आढळले.
- शारीरिक शिक्षकाच्या माहिती वरून औरंगाबाद शहरातीला माध्यमिक शाळेमध्ये ५५ ऽ क्रीडांगण नाही असे आढळले.
- विद्यार्थ्यांच्या माहिती वरून औरंगाबाद शहरातीला माध्यमिक शाळेमध्ये ३५ ऽ क्रीडांगण आहे असे आढळले.
- विद्यार्थ्यांच्या माहिती वरून औरंगाबाद शहरातीला माध्यमिक शाळेमध्ये ६५ ऽ क्रीडांगण नाही असे आढळले

- शिफारशी :

औरंगाबाद शहरतील प्रत्येक शाळेमध्ये क्रीडांगण आसणे.

- संदर्भ साहित्य


१. *बंडगार्ड, ए.सी. (१९५९) आयोवा पब्लिक स्कूल मधील शालेय विद्यार्थ्यांच्या शारीरिक शिक्षणाचे सर्वेक्षण. ११. पृ.क्र. ३८.*

२. *नेसन, जी. एब्ल्यु. (१९६२). लुसियानातील सार्वजनिक शाळेतील शारीरिक शिक्षणाचे मूल्यामापन. आरोग्य शारीरिक शिक्षण आणि मनोरंजनाचे संशोधन १४ पृ. क्र. ३७.*

३. *हर्लाचर, ई. (१९६३). शारीरिक शिक्षणाच्या उच्च माध्यमिक शाळेतील आरोग्य सुविधा, शारीरिक शिक्षण व खेळ. ३९ पृ.क्र. २२,२३.*

४. *क्लीफोर्ड, ए.डी. (१९६०), शारीरिक शिक्षणाच्या दक्षिण आलास्कातील कार्यक्रमाचे सर्वेक्षण. आरोग्य शारीरिक शिक्षण व खेळ यांचे संशोधन, १२ पृ.क्र. ७२.७३*

५. *गव्हर्नमेंट ऑफ इंडिया. (१९८०) रिपोर्ट ऑफ दी नॅशनल स्पोर्ट्स पॉलिसी- १९८० नवी दिल्ली : ऑल इंडिया स्पोर्ट्स कौन्सील मिनीस्टी ऑफ एज्युकेशन.*




Scanned by CamScanner